महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) , मुंबई- ४०००५१.
फोन: (वै) २६४७२६४५
(का) २६४७४२११: फॅक्स २६४७८५४४

**क्रमांक.मु.अ (वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/२००६-०७/१०९६७दिनांक: ०४/०५/२००६**

**परिपत्रक क्र ६३८**

**विषय:** ग्रामपंचायतींना रस्त्यावरील वीजेच्या दिव्यांच्या वीज बिलांचा रक्कम देण्यासाठी सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी लागणारे अनुदान.

**संदर्भ:** मु.अ.(वा) यांचे दि. २७.०२.०६ चे परिपत्रक क्र ६.२५.

वरील संदर्भानुसार ग्रामपंचायतीना रस्त्यावरील वीजेच्या दिव्यांच्या वीज बिलांचा रक्कम देण्यासाठी शासनाने दिलेल्या अनुदानाचा रक्कम समायोजित करण्यासाठी जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविली होती, परंतु शासनाच्या दि. १८.४.२००६ पत्रानुसार असे आढळून येते की वरील परिपत्रकाप्रमाणे रक्कम समायोजित न करता मंडळ कार्यालयामधून ग्रामपंचायतींना वीज तोडणीचे नोटिस बजविण्याचे आदेश देण्यात येत आहे असे समजते तेव्हा सर्व संबंधितांनी परिपत्रक क्र ६.२५ नुसार आदेश्याचे पालन करावे. थकबाकी पोटी एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच शासनाचे निधी नियंत्रक अधिकारी म्हणून, उपसचिव ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांच्याकडे पाठवावी.

तसेच २००६-०७ या वर्षात मंडळाचा या अनुदानाचा जिल्हानिहाय मागणी काय आहे याचा माहिती शासनास कळविणे आवश्यक आहे, त्यामुळे सर्व संबंधितांनी खालील दिलेल्या रकान्याप्रमाणे माहिती पुढील ७ दिवसात या कार्यालयास पाठवावी.

| जिल्हा | दिनांक ३१.३.०५ पर्यंत असलेली थकबाकी | सन २००५.०६ ची प्रत्यक्षातील बीलाची रक्कम | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास दि.३१.३.०६ पर्यंत देय रक्कम | सन २००५.२००६ या वर्षात शासनाने दिलेली रक्कम | फरक | सन २००६-०७ मधील अंदाजित मागणी | सन २००६.०७ या वर्षात शासनाचे देय एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ (२ ३) | ५ | ६ (४-५) | ७ | ८ (६ ७) |

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सविनय सादर:**

१) मां. मुख्य लेखा (वित्त) प्र.म.वि.वि. कंपनी मर्यादित मुंबई

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

**प्र त सस्नेह रवाना:**

सर्व मुख्य अभिय ंता, म.रा.वि.वि.कं.मय र्यादित, सं व सु परिमंडल कार्यालय.

माहिती व उचि ित कार्यवाहीसाठी.

**प्र त रवाना:**

१) सर्व अधिक्षक अभिय ंता/कार्यकारी अभिय ंता, सं व सु परिमंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मय र्या,

२) सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग).

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

९८२२६६८८८९ प्र मोदिनी

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com